'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

जा.क्र. कबचौउमवि / सीटीपीसी /१५/ २०२४ दि. १० / ०४ /२०२४

**तातडीचे**

प्रति,

१. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य / मान्यता प्राप्त परिसंस्थाचे संचालक.

**विषय :-** नविन शैक्षणिक धोरण-२०२० नुसार महाविद्यालयांतील पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांसाठी आंतरवासिता (Internship) उपलब्ध करुन देण्याबाबतची माहिती तातडीने पाढविणे बाबत..

**संदर्भ :- १. विद्यापीठाचे जा.क्र. कबचौउमवि / सीटीपीसी / ०५/२०२४ दि. ०१/०२/२०२४**
**२. म. उपसचिव (म.शा.) उच्च तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रमांक-एनईपी-२०२४/प्र.क्र.११/ विशि-३ दिनांक:- ०८/०४/२०२४**

**महोदय/ महोदया,**

उच्च तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या कडून Internship संदर्भातील प्राप्त मार्गदर्शक तत्वे व कार्यपध्दती (Draft) व सर्व संलग्नित महाविद्यालये / परिसंस्था / प्रशाळामध्ये Internship Cell स्थापन करणे संदर्भात कार्यवाही करण्यात यावी व Industrial / NGO / Govt. Organization यांच्या सोबत सामजस्य करार किंवा लिंकेजेस प्रस्थापित करण्यात याव्यात असे संदर्भ क्र. ०१ पत्रानुसार आपणास कळविले आहेच.

तदअनुषंगाने सर्व संलग्नित महाविद्यालये / परिसंस्था / प्रशाळामधील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांसाठी आंतरवासिता (Internship) उपक्रम उपलब्ध करुन देण्याबाबतच्या मार्गदर्शक तत्वांनुसार अद्याप आंतरवासिता कक्ष निर्माण करण्यात आला नसल्यास असा कक्ष निर्माण करुन त्यावर नियुक्त करण्यात आलेल्या नोडल अधिकारी चे नाव, दुरध्वनी क्रमांक व ई-मेल इत्यादीची माहिती दि. १२.०४..२०२४ पर्यत शासनास सादर करावी लागणार असल्याने आपल्या महाविद्यालय / परिसंस्था / प्रशाळाकडून खालील दिलेल्या गुगल फॉर्म वर माहिती दि. ११.०४.२०२४ पर्यत भरुन दयावी .

गुगल फॉर्म लिंक :- https://forms.gle/AH8yeBEDCJWgcFLz7

सोबत :- शासनाचे प्राप्त पत्र

**(प्रा. सोपान तुकाराम इंगळे)**
**प्र-कुलगुरु**

**प्रत :- मा. कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि,जळगाव.**

उमविनगर, जळगाव - ४२५००१ (महाराष्ट्र) भारत, दुरध्वनी क्र : ०२५७ - २२५८४२८, २२५८४२९ फॅक्स क्र.: ०२५७ - २२५८४०३,४०६
**Umavinagar, Jalgaon - 425 001 (Maharashtra) INDIA, Telephone No. 0257 - 2258428, 2258429**
**Fax No. 0257 - 2258403, 406 Email : registrar@nmu.ac.in Web : www.nmu.ac.in**

कालमर्यादा

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग , मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक4 18,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-400 032
दूरध्वनी क्र.०२२-२२७९३१७१ Email ID:- vishi3-hted@mah.gov.in

क्रमांक- एनईपी-२०२४ / प्र.क्र.११/ विशि-३ दिनांक:- ०८.०४.२०२४

प्रति,

कुलगुरु,
सर्व अकृषि विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

**विषय**- राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांतील पदवी/ पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांसाठी आंतरवासिता (internship) उपलब्ध करुन देण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे

संदर्भ- उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.एनईपी-२०२४/ प्र.क्र.११/ विशि-३ दि.५ फेब्रुवारी, २०२३

महोदय/ महोदया

राज्यामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने सर्व अकृषि विद्यापीठे व त्यासंलग्नित महाविद्यालयांमधील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठीच्या श्रेयांक संरचनेमध्ये (क्रेडीट) आंतरवासिता (internship) करीतासुद्धा श्रेयांक (क्रेडीट) निर्धारीत करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना हे श्रेयांक (क्रेडिट) उपलब्ध करुन देण्यासाठी त्यांच्या अभ्यासक्रमानुसार आंतरवासिता (internship) उपलब्ध करणे क्रमप्राप्त असल्याने विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठे, संलग्नित महाविद्यालये/ उच्च शिक्षण संस्थांकडून आंतरवासिता (internship) उपक्रम उपलब्ध करुन देण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे संदर्भाधीन दिनांक ०५फेब्रुवारी, २०२४ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आली आहेत.

तरी, सदर मार्गदर्शक तत्वांनुसार १) विद्यापीठ, संलग्नित महाविद्यालयांमध्ये आंतरवासिता कक्ष निर्माण करण्यात आले किंवा कसे? २) आंतरवासिता संदर्भात नियुक्त करण्यात आलेले विद्यापीठ, संलग्नित महाविद्यालयांमधील नोडल अधिकारी यांचे नाव, दुरध्वनी क्रमांक व ई-मेल याची माहिती दिनांक १२.०४.२०२४ पर्यंत शासनास सादर करण्यात यावी.

तसेच, यांसदर्भात अद्याप आंतरवासिता कक्ष निर्माण करण्यात आला नसल्यास असा कक्ष निर्माण करुन त्यावर नियुक्त करण्यात आलेल्या नोडल अधिकारी चे नाव, दुरध्वनी क्रमांक व ई-मेल इ. ची माहिती दिनांक १२.०४.२०२४ पर्यंत शासनास सादर करण्यात यावी.

आपला,

(अ.म. बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

निवड नस्ती विशि-३